स्वातंत्र्य सैनिकांच्या उच्चाधिकार समितीची पुनर्रचना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक – पीओएस १२८३/११६५/विक-२/स्वासै,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :१४ एप्रिल,१९८३.

पहा :- [१] शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग,क्र.पीओएस-१२८१/११६५/एससी-दोन-एफएफ,दिनांक २४ सप्टेंबर,१९८१.
[२] शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग,क्र.पीओएस-१२८१/११६५/एफएफ-एससी-दोन,दिनांक १९ ऑक्टोबर,१९८१.
[३] शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग,क्र.पीओएस-१२८१/११६५/एससी-दोन-एफएफ,दिनांक ८,जानेवारी,१९८२.
[४] शासन निर्णय क्र.सामान्य प्रशासन विभाग,क्र.पीओएस-१२८१/११६५/विक-२/स्वासै, दिनांक १९ जुलै,१९८२.

## शासन निर्णय

स्वातंत्र्य सैनिकांच्या उच्चाधिकार समितीची पुनर्रचना शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पीओएस १२८१/११६५/विक-२/स्वासै, दिनांक १९ जुलै,१९८२ अन्वये करण्यात आली होती ती आता रद्द करुन खालील प्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १] श्री.वसंतराव पाटील, मुख्य मंत्री | अध्यक्ष |
| २] श्री.भाऊसाहेबराव गायकवाड, वि.सं.स. | सदस्य |
| ३] श्री.नानासाहेब पुरोहित,महाड | सदस्य |
| ४] श्री.गोविंदभाई श्रॉफ,औरंगाबाद | सदस्य |
| ५] श्री.धुळाप्पा आण्णा नवले,सांगली | सदस्य सचिव |

२. या उच्चाधिकार समितीचे विचारार्थ विषय खालीलप्रमाणे आहेत:—
[अ] स्वातंत्र्य सैनिकांचे निवृत्ती वेतन व आर्थिक सहाय्य संबंधीचे आतापर्यन्त निकालात न काढलेले तसेच नवीन अर्ज निकाली काढणे.
[ब] सरकारी यंत्रणेच्या सहाय्याने अशा अर्जाबाबत चौकशी करणे.
[क] शासनाने विहीत केलेल्या सवलतींच्याबाबत आलेल्या अर्जावर शिफारशी करणे.

कृ.मा.प.

[ड] भारत सरकारने जाहीर केलेल्या योजनेनुसार स्वातंत्र्य सैनिकांकडून आलेले अर्ज तपासून त्या अर्जासंबंधी केंद्र शासनाकडे पेन्शन मंजूरीसाठी शिफारस करणे.

[इ] हूतात्मा स्मारक संबंधाचे प्रश्न निकाली काढणे.

३. या समितीच्या शासकीय,अशासकीय सदस्यांना नेहमीच्या नियमांनुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता देण्यात यावा [ या शासन निर्णया सोबतचे जोडपत्र पहा]·

४. शासनाचे अवर सचिव,सामान्य प्रशासन विभाग,[रोख शाखा]यांना समितीच्या अशासकीय सदस्यांच्या प्रवासभत्त्यांच्या बिलासंबंधी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे·आणि उप सचिव, महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग यांना त्या बिलांवर प्रतिस्वाक्षरी करण्यात प्राधिकृत करण्यात येत आहे·

५. या प्रस्तावावरील खर्च " २५२-सेक्रेटरीएट व इतर सर्वसाधारण सेवा[२] सचिवालय-मागणी क्रमांक – ७ या अर्थ संकल्पीय शीर्षाच्या खर्च खाली xxxxx टाकण्यात यावा व त्याखाली मंजूर केलेल्या अनुदानातून तो भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[ दा·प·कांबळे ],
उप सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति :—

१] राज्यपाल यांचे सचिव,
२] मुख्य मंत्री यांचे सचिव,
३] उप मुख्य मंत्री यांचे सचिव,
४] श्री·भागवतराव गायकवाड,वि·स·स·,
५] श्री·गोविंदभाई श्रॉफ,अध्यक्ष मराठवाडा जनता विकास परिषद, इ·बी·ई·सोसायटी,कॅम्पस,औरंगाबाद·
६] श्री·नानासाहेब पुरोहित,महाड,जिल्हा रायगड,
७] स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती: भूतपूर्व सदस्य सचिव श्री·रामजी पाटील व भूतपूर्व सभासद; श्री·मनोहर वाघ,मळगांवकर,जुने जालना,जालना·,